# प्रेस नोट दि. ३१/०७/१७

## दुचाकी चोरणाऱ्या वाहनचोरास अटक

पुणे शहरातील दक्षिण प्रादेशिक विभागाचे दरोडा प्रतिबंधक पथकातील पोना आयाज दड्डीकर यांना दि. २८/०७/१७ रोजी बातमी मिळाली की, एक इसम शिवनेरी रोड मार्केटयार्ड पुणे परीसरामध्ये चोरीची दुचाकी विकण्यास येणार आहे. त्या प्रमाणे सदर पथकाचे पोनि संतोष बर्गे यांनी सदरची माहिती वरीष्ठांना कळवले त्यांचे मार्गदर्शन घेऊन पथकातील स्टाफला सूचना दिल्या. त्यानुसार बातमीचे ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या टिम करुन सापळा रचून इसम नामे रवि लक्षमण पवार, वय २३ वर्षे रा शेलारमळा गुजरवाडी फाटा कात्रज पुणे मूळ हैदराबाद आंध्रप्रदेश यास संशयीत युनिकॉर्न गाडी क्र एम एच १२ जी एच ४१४१ हिचेसह ताब्यात घेतल्यावर त्याचेकडे सखोल तपास करता सदरची गाडी त्याने नवले ब्रिज पुणे मुंबई हायवे येथून चोरल्याचे सांगितले.तसेच आरोपीकडे अधिक तपास करता त्याने कोथरुड व अलंकार पो स्टे हद्दीतून गाड्या चोरल्याचे सांगितले असून सदर आरोपीचे ताब्यातून चोरीच्या ३ दुचाकी जप्त करुन १,००,१५०/- रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा मुळचा हैद्राबाद येथिल राहणार असून हा पुण्यामध्ये राहून गवंडी काम करीत आहे त्यास मो.सा चालविण्याचा शोक असून त्या प्रत्येक मोसा चा मूळ क्रमांक बदलून ४१४१ (दादा) असे नंबर टाकून त्या वापरत असे.

श्री. रविंद्र सेनगावकर, अपोआ दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, श्री. बसवराज तेली, पोउआ परीमंडळ १ पुणे, श्री. प्रविण मुंढे, पोउआ परीमंडळ २ पुणे, श्री. शिवाजी पवार, सपोआ स्वारगेट विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि प्रकाश मोरे, पोउनि चंद्रकांत लोहकरे, पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, रवि फुलपगारे,बाप्पू खुटवड, कृष्णा बढे, ढोक, घाटगे, युवराज कांबळे, बनसोडे, जाधव, मोहिते, वलटे, जगदाळे, शिंदे, शितकल, जाधव, जगताप, जमदाडे, कोंडे या स्टाफने सदर कामगिरी पार पाडली आहे.